# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 83 अन्वये आदेश

जा.क्र.जिउनिर/लेप/लोटेपरशुएन्व्हाप्रोकोऑसो//का.क.83/आदेश/सन 17
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, रत्नागिरी. यांचे कार्यालय,
रत्नागिरी. दिनांक - 11 /07/2017

**वाचा** :- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 83
महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961 चा नियम 71

**वाचले** :- 1. मे.करमरकर नाईक अँड असो. चार्टर्ड अकौंटंट यांचेकडिल
दिनांक 08/09/2015 अन्वये सादर केलेला विशेष अहवाल सन 2014-15

ज्याअर्थी, लोटे परशुराम इन्व्हार्यमेंट प्रोटेक्शन को-ऑप.सोसा.लि.लोटे, ता.खेड, जि.रत्नागिरी या संस्थेची नोंदणी महा. सह. संस्था अधिनियम 1960 चे तरतुदी अन्वये करणेत आली असून तिचा नोंदणी क्रमांक आरटीजी/केएचडी/ जीएनएल/ ओ/105/2000-01/सन 2000,दिनांक 19/9/2000 असा आहे आणि,

ज्याअर्थी, लोटे परशुराम इन्व्हार्यमेंट प्रोटेक्शन को-ऑप.सोसा.लि.लोटे, ता.खेड, जि.रत्नागिरी (यापुढे संस्था असे वाचावे) या संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 आणि त्याखालील नियम 1961 (यापुढे अधिनियम व नियम असे वाचावे) व संस्थेच्या नोंदणीकृत उपविधी यातील तरतुदीनुसार चालविणे अभिप्रेत व आवश्यक आहे. आणि,

ज्याअर्थी, वाचले क्र.1 अन्वये मे.करमरकर नाईक अँड असोसिएटस चिपळूण यांनी सदर संस्थेचे सन 2013-14 तसेच सन 2014-15 या वर्षाचे वैधानिक लेखापरीक्षण केलेले आहे. आणि सदर अहवालामध्ये आढळून आलेल्या गंभिर दोषांबाबत दिनांक 08/09/2015 अन्वये विशेष अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. आणि,

ज्याअर्थी, संबंधित लेखापरीक्षक यांनी सादर केलेल्या विशेष अहवालाचे अवलोकन करता संस्थेचे मंजूर उपविधी,कायदाकानूप्रमाणे संस्थेच्या संचालक मंडळाने कामकाज केलेले दिसून येत नाही असे नमूद केले असून, संस्थेच्या व्यवहारामधील खालील दोष निदर्शनास आणून दिलेले आहेत.आणि,

ज्याअर्थी, संस्थेस सदर दोषांबाबत म्हणणे सादर करणेसाठी या कार्यालयाकडून वेळोवेळी सुनावणी घेतलेल्या असून संस्थेने दिनांक 30/06/2016 अन्वये संस्थेचे लेखी म्हणणे सादर केलेले आहे. सदर म्हणणे विचारात घेता संस्थेने मे. प्राज इंडस्ट्रीज ला सी.ई.टी.पी च्या विस्तारीकरणाबाबतचे (अपग्रेडेशन) चे कामासाठी रक्कम रुपये 50,00,000/- (रुपये पन्नास लाख मात्र) लाख मोबिलायझेशन ॲडव्हान्स अदा करणेत आलेली असून संस्थेने दोन वेळा मागणी करुनही कंपनीने सदर रक्कमेचे सन 2015 चे बॅलन्स कन्फर्मेशन दिलेले नाही तसेच अद्यापही सदर रक्कम वसूल झालेली नाही, व सदरची रक्कम व्याजासह वसूल करणेस पात्र आहे. त्यामुळे संस्थेने मे.प्राज इंडस्ट्रीज कंपनीला रु. 50.00 लाख अदा केलेल्या रक्कमेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 83 अन्वये चौकशी होणे आवश्यक आहे.आणि,

ज्याअर्थी, उपरोक्त नमुद मुद्दयाची सखोल चौकशी कायदा कलम 83 अन्वये करणे आवश्यक आहे, असा संस्थेने लेखापरीक्षक यांनी अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने संस्थेचे व सभासदांचे हित व निकोप सहकार चळवळीचे वाढीसाठी/संगोपनासाठी उपरोक्त मुद्यांची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 83 अन्वये स्वतंत्रपणे चौकशी अधिकारी नियुक्त करुन सखोल चौकशी करणे आवश्यक आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 83 अन्वये मला प्रदान करणेत आलेल्या अधिकारापरत्वे मी, श्रीमती बी. एस. माळी, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रत्नागिरी, या आदेशान्वये लोटे परशुराम इन्व्हार्यमेंट प्रोटेक्शन को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि.लोटे, ता.खेड, जि.रत्नागिरी या संस्थेच्या कामकाज / व्यवहाराबाबत सोबतच्या परिशिष्टातील मुद्दयांबाबत तसेच संस्थेची घटना, कामकाज आणि आर्थिक परिस्थिती याबाबतची चौकशी करणेसाठी श्री. आ. के. बांगर, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, खेड, तालुका - खेड, जिल्हा - रत्नागिरी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. चौकशी अधिकारी यांनी सोबतच्या परिशिष्टातील मुद्दयाची व त्या अनुषंगिक बाबींची चौकशी करुन वस्तुस्थितीदर्शक, स्वयंस्पष्ट व कारवाई सूचक तपशीलावर सविस्तर अहवाल सादर करावा. चौकशी अधिकारी यांनी आपले स्वत:चे कार्यालयीन कामकाज सांभाळून एक महिन्याचे आंत चौकशीचे काम पूर्ण करावे.

सदरचा आदेश मी, आज दिनांक 11/07/2017 रोजी माझ्या सहीने व कार्यालयीन मुद्रेसह निर्गमित केला असे.

(बी. एस. माळी)
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, रत्नागिरी.

**प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी -**

1. चेअरमन/व्यवस्थापक,
   लोटे परशुराम इन्व्हार्यमेंट प्रोटेक्शन को-ऑप.सोसा.लि.लोटे,ता.खेड,जि.रत्नागिरी.
   2/- त्यांनाआदेशीत करणेत येते किं, चौकशीसाठी लागणा-या खर्चासाठी रुपये 10,000/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) रत्नागिरी जिल्हा मध्य. सह. बँक लि.रत्नागिरी शहर शाखा-रत्नागिरी,ता.जि.रत्नागिरी येथील जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, रत्नागिरी यांचे बचत खाते क्र.75 मध्ये भरणा करुन चलनाची प्रत या कार्यालयास सादर करावी.

2. श्री. आर. के. बांगर, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, खेड, तालुका खेड, जि.रत्नागिरी.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर**

1. मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे.
2. मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई.

**प्रत :-** सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,खेड यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना

(बी. एस. माळी)
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, रत्नागिरी.

**परिशिष्ट 'अ'**

संस्थेचे सन 2014-15 चे वैधानिक लेखापरीक्षणाबाबत मे.करमरकर नाईक अँड असो. चिपळूण यांनी विशेष अहवाल सादर केला असून संस्थेने मे. प्राज इंडस्ट्रीज ला सी.ई.टी.पी. चे अपग्रेडेशन कामी रक्कम रुपये 50,00,000/- मोबीलायझेशन ॲडव्हान्स दिलेला असून संस्थेने दोन वेळा मागणी करुनही कंपनीने सदर रक्कमेचे सन 2015 चे बॅलन्स कन्फर्मेशन संस्थेस दिलेले नाही तसेच सदरची रक्कम अद्यापही वसूल झालेली नाही.

**(बी. एस. माळी)**
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, रत्नागिरी.